**वाचले** :- १. मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील आदेश क्रमांक जमीन १०१०/३७५ दिनांक २३.०५.१९९०
२. मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील बिनशेती आदेश क्र.कावि जमीन/१०९९/एसआर/१६२/९९, दिनांक २६.१०.१९९९
३. जे. बी. असोसिएटस चे भागीदार आशिष रमेचंद्र बिर्ला व इतर ०३ रा. जळगांव यांचा दि. २५/०३/२०२१ रोजीचा अर्ज
४. सहायक संचालक नगररचना, जळगांव यांचे कडील मंजूर नकाशा पत्र जा.क्रं. एकत्रिकरण/मौ.सावखेडा बु. ता.जि. जळगांव/ग.नं. १७५/भूखंड क्र.१५२,१५३,१६२,१६३/ससं-जळ/१२३५ दिनांक २०/०४/२०२१
५. तहसिलदार जळगांव याच्या कडील पत्र क्र. जमीन/३/कावि/४०२/२०२१ दि. १०/०५/२०२१

---------------------------------------------------- 000 ----------------------------------------------------

क्रं.जमीन/कावि/ईटपाल/०२/२०२१
उप विभागीय अधिकारी, जळगांव
भाग जळगांव यांचे कार्यालय,
जळगांव. दिनांक १८ /०५/२०२१

**आदेश**

उपोद्घातातील अनुक्रमांक ०३ नुसार अर्जान्वये जे. बी. असोसिएटस चे भागीदार आशिष रमेचंद्र बिर्ला व इतर ०३ रा. जळगांव यांनी त्यांचे कब्जेउपभोगातील स्वमालकीचे मौजे सावखेडा बु. ता. जि. जळगांव येथील गट नं. १७५ या मधील प्लॉट क्र. १५२, १५३, १६२ व १६३ चे एकुण एकत्रित क्षेत्र १५२५.५० चौ.मी. क्षेत्राचे मंजुर नकाशाप्रमाणे एकत्रिकरण होवुन ७/१२ उतारे करुन मिळणे बाबत दिनांक २५/०३/२०२१ रोजी विनंती अर्ज दिलेला आहे.

सहायक संचालक नगररचना, जळगांव यांचे कडील मंजूर नकाशा पत्र जा.क्रं. एकत्रिकरण/मौ.सावखेडा बु. ता.जि. जळगांव/ग.नं. १७५/भूखंड क्र.१५२,१५३,१६२,१६३/ससं-जळ/१२३५ दिनांक २०/०४/२०२१ अन्वये एकत्रिकरण नकाशा मंजुर केला आहे. यास्तव, मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील उपोदघातातील क्रं.०१ चे आदेशानुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी उपविभागीय अधिकारी, जळगांव भाग जळगांव मौजे सावखेडा बु. ता. जि. जळगांव येथील गट नं. १७५ या मधील प्लॉट क्र. १५२, १५३, १६२ व १६३ चे एकुण एकत्रित क्षेत्र १५२५.५० क्षेत्राचे मंजुर नकाशाप्रमाणे एकत्रिकरणास खालील अटी व शर्तीवर मंजूरी देत आहे.

| एकत्रिकरण अगोदरचे क्षेत्र | | | | एकत्रिकरण नंतरचे क्षेत्र | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स.नं. | प्लॉट नंबर | क्षेत्र चौ.मी | कब्जेदाराचे नांव | स.नं. | प्लॉट नंबर | क्षेत्र चौ.मी | कब्जेदाराचे नांव |
| १७५ | १५२ | ३६६.०० | जे.बी. असोसिएटस तर्फे भागीदार अलोक अविनाश जखोटिया ( जाखेटे) ,आशिष रमेचंद्र बिर्ला, कल्पना आशिष बिर्ला, पुजा अविनाश जाखेटे | १७५ | १५२+१५३+ १६२+१६३ | १५२५.५० | जे.बी. असोसिएटस तर्फे भागीदार अलोक अविनाश जखोटिया ( जाखेटे) ,आशिष रमेचंद्र बिर्ला, कल्पना आशिष बिर्ला, पुजा अविनाश जाखेटे |
| | १५३ | ४०९.५० | | | | | |
| | १६२ | ३७५.०० | | | | | |
| | १६३ | ३७५.०० | | | | | |
| | एकुण | १५२५.५० चौ.मी. | | | एकुण | १५२५.५० चौ.मी. | |

अटी / शर्ती

१ सदर एकत्रिकरण भुंखडाचे उप अधिक्षक भुमि अभिलेख यांचे कार्यालयाकडुन जागेवर सिमांकीत करुन घेऊन मोजणी करुन घेण्यांत यावी. सिमांकनानंतर भुखंडाचे क्षेत्र नकाशात दर्शविलेल्या क्षेत्रापेक्षा कमी नसावे.

२ सहायक संचालक नगररचना, जळगांव यांचे कडील मंजूर नकाशा पत्र जा.क्रं. एकत्रिकरण/मौ.सावखेडा बु. ता.जि. जळगांव/ग.नं. १७५/भूखंड क्र.१५२,१५३,१६२,१६३/ससं-जळ/१२३५ दिनांक २०/०४/२०२१अन्वये एकत्रिकरण नकाशे मंजुर केलेल्या पत्रातील अटी व शर्ती अर्जदारास बंधनकारक राहतील.

३ सदर भुखंडाचे एकत्रिकरण यापुढे करता येणार नाही.

४ सदर भुखंडात बांधकाम करणेपुर्वी सक्षम अधिकारी यांचेकडुन बांधकाम परवानगी घेतल्याशिवाय बांधकाम करु नये.

५ मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील दि. २६/१०/१९९९ रोजीचा बिनशेती परवानगी आदेशात ज्या प्रयोजनार्थ परवानगी दिलेली आहे, त्यामध्ये बदल करता येणार नाही. तसेच सदर आदेशामधील अटी व शर्तीचे पालन अर्जदार यांनी करणे बंधनकारक असून बिनशेती आदेशातील अटी व शर्तीचे उल्लंघन झाले असल्यास एकत्रिकरण विभाजनास दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

६ सदर एकत्रिकरण परवानगी मागणी करतेवेळेस अर्जदाराने प्रकरणासोबत दाखल केलेली मालकी हक्काची कागद पत्रे ग्राहय धरण्यांत आली आहेत, सदर कागदपत्रे भविष्यात दिशाभुल करणारी आढळुन आल्यास अथवा जमीन महसूल कायद्यातील किंवा इतर काही कायदेशीर बाब उपस्थित झाल्यास दिलेली परवानगी रद्द समजण्यांत येईल यांची नोंद घ्यावी.

७ प्रस्तुत प्रकरणात काही न्यायालयीन अथवा कायदेशीर वाद उपस्थित झाल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यांत येईल यांची नोंद घ्यावी.

८ विषयांकित मिळकतीचा गांव नमुना नं. ७/१२ वरील इतर अधिकारातील गहाण खत बोजे, इकरार बोजे अथवा इतर नोंदी जशाच्या तशा राहतील. त्याबाबत अर्जदाराची सर्वस्वी जबाबदारी राहील.

९ अर्जदाराकडून नियमाप्रमाणे आवश्यक विकास शुल्क वसूल करणे आवश्यक आहे.

१० सदरहु प्रकरणात करण्यांत आलेली एकत्रिकरण नकाशांची मंजुरी ही सदर आदेशापासून एक वर्ष कालावधीसाठी वैध राहील, तदनंतर त्यास मुदतवाढ घेणे बंधनकारक राहील.

वरील प्रमाणे कोणत्याही अटीचा भंग केल्यास सदर एकत्रिकरण परवानगी रद्द करण्यांत येईल.

स्वाक्षरीत/-**

**(प्रसाद मते)**
**उपविभागीय अधिकारी**
**जळगांव भाग जळगांव**

**प्रत** :- तहसिलदार जळगांव यांना माहितीकामी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

**प्रत** :- उप अक्षिक्षक भुमि अभिलेख, जळगांव यांना माहितीस्तव.

**प्रत** :- सहाय्यक संचालक, नगर रचना, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांना माहितीस्तव.

**प्रत** :- तलाठी सावखेडा बु. ता.जि.जळगांव यांना पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

**प्रत** :- जे. बी. असोसिएटस चे भागीदार आशिष रमेचंद्र बिर्ला व इतर ०३ रा. जळगांव ता. जि. जळगाव.

उप-विभागीय अधिकारी जळगांव भाग जळगांव महाराष्ट्र शासन

**(प्रसाद मते)**
**उपविभागीय अधिकारी**
**जळगांव भाग जळगांव**